Publication - Tarun Bharat

Date 27/11/2014

गुरुवार, २७ नोव्हेंबर २०१४

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

'सत्यशोधक' नाटकाची ध्वनी चित्रफीत आज दाखविणार

# केएटी म्हणजे काय रे '

वकिलांच्या आंदोलनामुळे नागरिकांत उत्सुकता

सरकारी कर्मचाऱ्यांवरील अन्यायाला दाद मागण्याचे व्या

# कडबमचा मनोविकारतज्ज्ञ पुरस्कार डॉ. एन. एम. पाटील यांना

**बेळगाव :** कडबम सायकॅट्रीक रिहॅबीलीटेशन सेंटर बेंगळूरचा उल्लेखनीय मनोविकारतज्ज्ञ पुरस्कार केएलईचे डॉ. एन. एम. पाटील यांना जाहीर करण्यात आला. संस्थेच्या २२ व्या वार्षिक संमेलनाच्या निमित्ताने हा पुरस्कार त्यांना देण्यात येणार आहे. डॉ. पाटील हे उत्तर कर्नाटकातील प्रथितयश मनोविकारतज्ज्ञ म्हणून कार्यरत असून जेएनएमसीच्या मानसोपचार विभागाचे प्रमुख आहेत. तसेच केएलईएस हॉस्पिटलमध्ये प्रमुख सल्लागार आहेत. ग्रामीण भाग तसेच अपंग आणि मतीमंदांसाठी विशेष शिबिरे भरविण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. शनिवार दि. २९ रोजी राज्यपाल वजुभाई वाला यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. ब्रिटीश डेप्युटी हायकमिशनर इयान फेल्टान व इतर मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात येणार आहे. ५४ हजार रुपये रोख, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

